**ठळक बातम्या**

- ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारतानं पाकिस्तानची सहा विमानं पाडली असं हवाई दलप्रमुखांचं निवेदन

- रेल्वेच्या ‘राउंड ट्रिप पॅकेज’ अंतर्गत प्रवाशांना परतीच्या प्रवासभाड्यात २० टक्के सवलत मिळणार

- राज्यात सर्वत्र रक्षाबंधनाच्या सणाचा उत्साह

**आणि**

- उत्तरकाशीमध्ये धाराली इथं गेलेले महाराष्ट्रातले सर्व पर्यटक सुरक्षित

<><><><>

ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारतानं पाकिस्तानची सहा विमानं पाडल्याची माहिती हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंह यांनी आज बेंगळुरू इथं एका व्याख्यानात दिली. यात पाकिस्तानी हवाई दलाच्या पाच, तर एका सूचना आणि नियंत्रण विमानाचा समावेश असल्याचंही त्यांनी सांगितलं. ही कारवाई जवळपास ३०० किलोमीटर अंतरावरून केल्याचं सांगून जमिनीवरून हवेत मारा करण्याचा हा उच्चांक असल्याचंही सिंह यांनी नमूद केलं. शाहबाज जेकोकाबाद हवाई तळावर भारतानं केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात काही विमानांचं नुकसान झाल्याचंही ते म्हणाले. भारताने या कारवाईदरम्यान अतिशय अचूक हल्ले केले आणि तिन्ही सशस्त्र दलांच्या समन्वयाचं दर्शन घडवलं, तसंच हवाई संरक्षण यंत्रणांनीही उत्तम कामगिरी केली, असं मत सिंह यांनी मांडलं.

<><><><>

आर्थिक वर्ष २०२४-२५ मधे देशाचं संरक्षण उत्पादन एक लाख ५१ हजार कोटी रुपयांच्या उच्चांकी पातळीवर पोहोचलं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी समाजमाध्यमावर ही माहिती दिली. संरक्षण औद्योगिक क्षेत्र बळकट होत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. गेल्या वर्षीपेक्षा ही उत्पादनवाढ १८ टक्के जास्त आहे. यासाठी संरक्षणमंत्र्यांनी संरक्षण उत्पादन विभाग आणि इतर संबंधितांची प्रशंसा केली.

**<><><><>**

जम्मू-काश्मीरच्या कुलगाममध्ये दहशतवाद्यांविरुद्ध गेल्या नऊ दिवसांपासून सुरु असलेल्या लष्करी कारवाईदरम्यान आज सकाळी एका दहशतवाद्याला भारतीय जवानांनी कंठस्नान घातलं. काल रात्री झालेल्या गोळीबारात दोन जवान शहीद झाले असून अनेक सुरक्षा कर्मचारी जखमी झाले आहेत.

या परिसरात ८ दहशतवादी लपून बसल्याची खबर मिळाल्यावरुन शोध मोहीम राबवण्यात येत आहे.

**<><><><>**

भारतीय रेल्वेने ‘राउंड ट्रिप पॅकेज’ नावाची योजना लागू करण्याचा निर्णय घेतला असून, या अंतर्गत प्रवाशांना परतीच्या प्रवासात तिकिट दरात २० टक्के सवलत दिली जाईल. दोन्ही बाजूंच्या प्रवासाचं आगाऊ तिकीट घेतल्यावरच ही सवलत लागू होईल, तसंच या तिकिटावर संबंधित प्रवाशाव्यतिरिक्त अन्य कोणतीही व्यक्ती प्रवास करू शकणार नाही, असं रेल्वे मंत्रालयानं जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. या योजने अंतर्गत आरक्षित केलेलं तिकीट रद्द केल्यावर त्याचा परतावा दिला जाणार नाही.

ऑक्टोबर १३ या तारखेपासूनची परतीची तिकिटं येत्या १४ ऑगस्ट पासून आरक्षित करता येतील. एकदिशा प्रवासाकरता आगाऊ आरक्षण केवळ ६० दिवस आधी उपलब्ध असलं तरी परतीच्या प्रवासाचं तिकिट काढताना ६० दिवसांचा आगाऊ आरक्षण कालावधी लागू होणार नाही.

**<><><><>**

लोकसभा निवडणुकीत बनावट मतदान झाल्याचं सादरीकरण राहुल गांधी यांनी सखोल अभ्यास करून केलं आहे, मात्र निवडणूक आयोगानं गांधी यांना शपथपत्र सादर करायला सांगितलं, हे योग्य नाही असं मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज मांडलं. ते नागपूर इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपासंदर्भात निवडणूक आयोगानं सखोल चौकशी करायला हवी, अशी मागणी पवार यांनी केली. याविषयी विरोधी पक्षाचे सर्व खासदार येत्या सोमवारी निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर मोर्चा काढणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली..

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
९ ऑगस्ट २०२५ - शनिवार

**--- होल्ड- मुख्यमंत्री- --**

दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत महाविकास आघाडीच्या घटक पक्षांमध्ये अद्याप कोणतीही चर्चा झाली नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं. तसंच अजित पवार यांच्या पक्षासोबत जाणार का या प्रश्नावर भाजपासोबत असणाऱ्या पक्षांच्या सोबत आपण जाणार नाही, असं पवार यांनी स्पष्ट केलं.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आजपासून राज्यभरात जनजागृती अभियान राबवणार आहे. राज्यात पन्नास टक्के लोकसंख्या तरुणांची असून त्यांच्यासमोर असलेल्या असंख्य प्रश्नांची सोडवणूक करायची गरज आहे, त्यादृष्टीने हे अभियान राबवलं जात असल्याचं शरद पवार यांनी सांगितलं.

**<><><><>**

जनतेला न्याय मिळवण्यासाठी वणवण करायला लागू नये याकरता न्यायालयांची संख्या वाढवून त्यासंबंधीच्या सुविधा राज्य शासन उपलब्ध करुन देत आहे, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सांगितलं. ठाणे जिल्ह्यात चिखलोली-अंबरनाथ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग आणि दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर यांच्या इमारतीचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. कल्याण इथल्या न्यायलयाची इमारतही नव्यानं उभारण्याबाबत विचार करू, असं आश्वासन त्यांनी दिलं. न्यायालयांसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणं ही शासनाची जबाबदारी आहे, असं ते म्हणाले.

**<><><><>**

श्रोते हो, स्वातंत्र्य दिन अवघ्या आठवडाभरावर आला आहे. आतापर्यंतच्या स्वातंत्र्य दिनाच्या तुमच्या काही आठवणी असतील तर त्या अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्याची संधी आकाशवाणीनं तुम्हाला उपलब्ध करुन दिली आहे. स्वातंत्र्यदिनाच्या संदर्भातल्या तुमच्या आठवणी सांगणारा व्हिडिओ रेकॉर्ड करा आणि फेसबुक किंवा इन्स्टाग्रामवर आमच्या airnews mumbai या अकाऊंटला टॅग करा. अधिकाधिक लोकांपर्यंत तो पोहोचवण्यासाठी आम्ही तुम्हाला मदत करू.

**<><><><>**

भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचा सण रक्षाबंधन आज सर्वत्र साजरा होत आहे. यानिमित्त ठिकठिकाणी रंगीबेरंगी राख्या, भेटवस्तू, मिठाईने बाजारपेठा फुलल्या आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी रक्षाबंधनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. भावाबहिणीतलं परस्पर प्रेम आणि विश्वासाचं निदर्शक असलेला हा सण आपल्या समृद्ध परंपरेचा ठेवा असल्याचं राष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतल्या निवासस्थानी लहान मुलांबरोबर रक्षाबंधनाचा सण साजरा केला.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. मुंबईत राजभवन इथं दृष्टिहीन विद्यार्थिनी, ठाणे, रायगड आणि पालघर जिल्ह्यातून आलेल्या आदिवासी विद्यार्थिनी, मुंबई महानगर पालिकेअंतर्गत महिला बचत गटाच्या सदस्यांनी तसंच पालिकेच्या शाळांमधल्या विद्यार्थिनींनी रक्षाबंधनानिमित्त राज्यपालांना राखी बांधून औक्षण केलं.

<><><>

श्रावण पौर्णिमेला संस्कृत भाषा दिनही साजरा करण्यात येतो. त्यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संकृत भाषेचा गौरव करणारा संदेश दिला आहे. गेल्या दशकभरात केंद्र सरकारनं संस्कृत भाषेच्या जतन आणि संवर्धनासाठी अनेक पावलं उचलली असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. त्यात केंद्रीय संस्कृत विद्यापीठांची स्थापना आणि प्राचीन हस्तलिखितांच्या संगणकीकरणासाठीचं ज्ञान भारतम अभियान यांचा उल्लेख त्यांनी केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही संस्कृत दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><>

ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त गिरगाव चौपाटीवरील लोकमान्य टिळक पुतळ्यापासून ऑगस्ट क्रांती मैदानापर्यंत आज पदयात्रा काढण्यात आली. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांच्या नेतृत्वाखाली गवालिया टँक इथं स्वातंत्र्य चळवळ आंदोलनातील हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

भारत छोडो आंदोलनात सहभागी झालेल्यांना आज सर्वत्र अभिवादन करण्यात येत आहे.

<><><>

उत्तरकाशीमध्ये धाराली इथं गेलेले महाराष्ट्रातले सर्व पर्यटक सुरक्षित असून, त्यांना आपत्तीग्रस्त भागातून जॉली ग्रँड विमानतळ आणि मताली कॅम्प या सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आल्याचं आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी म्हटलं आहे. उत्तराखंडमध्ये, उत्तरकाशी जिल्ह्यातल्या धाराली इथं पूरग्रस्त भागात मदत आणि बचाव कार्य युद्ध पातळीवर सुरू आहे. केंद्र आणि राज्य सरकारी संस्था बेपत्ता नागरिकांचा शोध घेत आहेत, आणि त्या भागातल्या मूलभूत सुविधा सुरळीत करण्याचा अथक प्रयत्न करत आहेत. आज सकाळी पूरग्रस्त भागातल्या ७४ नागरिकांची सुटका करून त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं.

**<><><><>**

मुंबई सीमाशुल्क विभागाने मुंबई विमानतळावर ९४७ ग्रॅम अंमली पदार्थ आणि ३ किलो २ ग्रॅम सोन्याची भुकटी पकडली. एका विमानतळ कर्मचाऱ्याकडून हस्तगत करण्यात आलेल्या या सोन्याच्या भूकटीची किंमत २ कोटींहून जास्त आहे. तर बँकॉकहून आलेल्या प्रवाशाकडून मारिजुआना हा अंमली पदार्थ ताब्यात घेण्यात आला, त्याची किंमत ९४ लाख रुपये आहे. या प्रकरणी दोघांना ताब्यात घेण्यात आलं.

**//<><><><>//**